# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय,लातूर.

| | | |
|---|---|---|
| Office : 02382-250634<br>Fax :- 02382-251866<br>E-mail:- celatur@mahadiscom.in | महावितरण | Office of the Exe. Engr. CGRF<br>Latur Zone, Vidyut Bhavan, Ground floor, Old power house, Sale galli, Latur – 413512 |
| EE/CGRF/LTR/ 64 | | Date :- 03.06.2019 |

**ग्राहक तक्रार क्र.** : ०५/२०१९
**तक्रार दाखल दिनांक** : ०१.०४.२०१९

**प्रति,**
१ **श्री. मेडपल्ले प्रकाशआप्पा भिमराव**
अंजली नगर, लातूर.

२. **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
अति. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, दक्षिण उपविभाग, लातूर.

**विषय :-** तक्रार अर्ज क्र. ०५/२०१९ प्रकरणी निकालाची प्रत पाठविणे बाबत..

वरील विषयास अनुसरुन श्री. मेडपल्ले प्रकाशआप्पा भिमराव यांच्या तक्रार अर्जाप्रमाणे सुनावणी घेवून तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे. सदरील प्रकरणी निकालाची छायांकीत प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडली आहे.

**कार्यकारी अभियंता**
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत
ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर

**सोबत :** वरीलप्रमाणे

**प्रतिलिपी सविनय सादर :-**
१ मुख्य अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, परिमंडल कार्यालय, लातूर.

**प्रतिलिपी :-**
१. कार्यकारी अभियंता (प्र), म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, मंडल कार्यालय, लातूर.
२. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत, विभागीय कार्यालय, लातूर.

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच महावितरण परिमंडल कार्यालय,लातूर.

**ग्राहक तक्रार क्रमांक** : ०५/२०१९
**ग्राहक तक्रार दाखल दिनांक** : ०१.०४.२०१९

**श्री. मेडपल्ले प्रकाशआप्पा भिमराव**
**रा. अंजली नगर, लातूर .** **-- ग्राहक**
**अर्जदार**

**-- विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
**अति. कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि. कंपनी मर्यादीत,**
**दक्षिण उपविभाग, लातूर.** **-- गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम :** | **श्री. पंडितराव बी. मोरे** | **अध्यक्ष** |
| | **श्री. सुधीर भाऊराव देशमुख** | **सदस्य** |
| | **श्री. एम. एस. मिसाळ** | **सचिव** |

## निकाल
## दि. ०३.०६.२०१९

ग्राहक/अर्जदार, श्री. मेडपल्ले प्रकाशआप्पा भिमराव, रा. अंजली नगर लातूर. (ग्राहक क्र. ६१०५५०७८१८०१) यांनी त्यांची तक्रार अ फॉर्ममध्ये दि. ०१.०४.२०१९ रोजी मंचामध्ये दाखल केली आहे. त्यातील तपशिल खालील प्रमाणे आहे.

२) त्यांचे तक्रार असे आहे की, त्यांचे घरगुती वापराचे मीटर असुन त्यांचा ग्राहक क्र. ६१०५५०७८१८०१ आहे.सदरचे मिटर 90/LT 1 Residence 1 Phase प्रकारचे आहे. तक्रारदार विज कनेक्शन अंजली नगर, लातूर येथे नोव्हेंबर २००८ पासून वापरत असुन त्याचे बिल मी वेळेवर भरत आहे. परंतु त्यांना नोव्हेंबर २०१८ ते जानेवारी-२०१९ चे बिल जास्तीचे आले आहे अशी त्यांची तक्रार आहे. प्रत्यक्षात तेवढा वापर झालेला नसताना सुध्दा त्यांनी सदर बिल भरलेले आहे. या कारणास्तव हे बिल मला जास्तीचे आले आहे ते कमी करुन देण्यात यावे अशी विनंती केली आहे.

३) गैर अर्जदार/महावितरण तर्फे अतिरिक्त कार्यकारी अभियंता महावितरण, दक्षिण उपविभाग, लातूर यांचे पत्र क्र. जा.क्र. अति. काअ/उवि/(द) लातूर/ लेखा/ ५३१ दि. ०१.०४.२०१९ नुसार विज ग्राहकास माहे ऑक्टोंबर २०१८ चे वीजबील हे सरासरी १६२ युनिटचे वीजबील निर्गमीत झाले होते. माहे नोव्हेंबर २०१८ चे वीजबीलाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, माहे नोव्हेंबर २०१८ मध्ये वीजग्राहकास एकूण दोन महिन्याचे मिळून ११४९ युनिटचे वीजबील निर्गमीत झाले आहे. सदर बीलातून

माहे ऑक्टोंबर २०१८ मध्ये सरासरी युनिटचे वीजबीलाची रक्कम रु. (-) ११३७.४० वजा करून एकूण रु. १२१७०/- चे वीजबील निर्गमीत झालेले आहे.

४) ग्राहकाच्या विनंती नुसार त्यांनी मिटर तपासणीसाठी दि. २९.११.२०१८ रोजी तपासणी रक्कम रु.२००/- व जी.एस.टी. रु. ३६/- असे एकूण रु. २३६/- पावती क्र. ७८२४८५० अन्वये भरणा केला. त्यानुसार सदर मिटरची तपासणी मिटर चाचणी कक्ष, लातूर येथे दि. ०१.१२.२०१८ रोजी करण्यात आलेली असून सदर मिटर सुस्थितीत असल्याचा अहवाल मीटर चाचणी कक्षाने दिला आहे. म्हणजेच माहे ऑक्टोंबर २०१८ ते माहे नोव्हेंबर २०१८ या कालावधीत वीजग्राहकाने वीजचा मोठ्याप्रमाणात वापर केला असल्याचे शक्यता नाकारता येत नाही.

५) दि. ०१.०१.२०१८ पासून महावितरणचे ऑनलाईन कॅश कलेक्शन सेंटर सुविधा सुरु करण्यात आलेली असून सदर प्रणालीत असलेल्या नियमानुसार वीजग्राहकने वीजबीलापोटी दिलेला धनादेश बँकेत वटविण्यासाठी पाठविण्यापूर्वी धनादेशी पावती फाडणे आवश्यक असून त्यानुसार सदर प्रणालीत दि. २१.०२.२०१८ रोजी पावती (क्र. ८३२९०८०) देण्यात आली.

६) सदर धनादेश महावितरणचे स्टेट बँक ऑफ इंडियामधील खात्यावर जमा केला असता सदर धनादेश वीजग्राहकाचे बँक खात्यावर पूरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे अनादरीत झाला असल्याचे बँकेने या कार्यालयास आवक परत असलेल्या मेमोद्वारे कळविले आहे. सदर वीजग्राहकाचा धनादेश अनादरीत झाल्यामुळे बँकेने नियमानुसार महावितरण कंपनीस दंड आकारला असून महावितरणचे नियमानुसार वीजग्राहकास महावितरण कंपनीने केवळ दंडाची रक्कम रु. ८८५/- माहे मार्च २०१९ चे वीजबीलात आकारली आहे.

७) सदर गैर अर्जदार तर्फे श्री. एम.एम. रामढवे, सहाय्यक लेखापाल, दक्षिण उपविभाग, लातूर यांनी त्यांची बाजु अशी मांडली की, ग्राहकचे दि. ०१.१२.२०१८ रोजी तपासले असून मिटर चाचणी कक्षांनी ग्राहकाचे मीटर सुस्थितीत असल्याचे अहवाल दिला असून माहे ऑक्टोंबर २०१८ चा MD ०४.०८ असा दर्शविला आहे. माहे सप्टेंबर २०१८ चा MD ०४.९८ असा दर्शविला आहे. याचा अर्थ असा होतो की, सदर दोन्ही महिन्याच्या कालावधीत ग्राहकाने मंजूर भारापेक्षा अतिरिक्त (जास्तीचा भार) विजवापर केला आहे. त्यामुळे वीजग्राहकाने सदर दोन्ही महिन्याच्या कालावधीमध्ये एकून ११४९ युनिट वीज वापर केला आहे. जो संयुक्तीक आहे.

८) त्यानुसार मंचाने सदर ग्राहकाची स्थळतपासणी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार ग्राहकाची स्थळतपासणी दि. २६.०४.२०१९ रोजी केली. त्याचा अहवाल AE/U-८/ LTR/ No. २४४ dt. ०४.०५.२०१९ नुसार प्राप्त झाला सदर अहवाला नुसार सदर ग्राहकाकडे अजुन एक मिटर असून ग्राहक दोन्ही पैकी एक मिटरचा वापर अदला बदल करुन वापरत आहे. असे सुनावनी दरम्यान गैर अर्जदार तर्फे श्री. एम.एम. रामढवे, सहाय्यक लेखापाल, दक्षिण उपविभाग, लातूर यांनी सांगितले. सदर बाब अर्जदार सुनावणी दरम्यान मान्य केली. .

## निष्कर्ष

अर्जदार ग्राहकास नोव्हेंबर २०१८ मध्ये ११४९ युनिट वापराचे बिल गैर अर्जदार महावितरणने दिले आहे. सदर ग्राहकाचा वापर इतका दिसुन येत नाही. परंतु सदर बिले हे नोव्हेंबर २०१८ चे आहे असे दिसुन येते. सदर ग्राहकाचे मिटर तपासणी केले असता मिटर व्यवस्थीत असल्याचे अहवालावरुन दिसुन येते. ग्राहकाची स्थळतपासणी केली असता ग्राहकाकडे अजुन एक मिटर असून ग्राहक दोन्ही पैकी एक मिटरचा वापर अदला बदल करुन वापरत आहे त्यामुळे ग्राहकाचे विज बिल हे योग्य आहे. असे मंचाच्या निदर्शनास येते.

## आदेश

१) ग्राहक अर्जदाराची अ फॉर्म मधील तक्रार रद्द करण्यात येत आहे.

२) ग्राहकाकडे असलेली थकबाकी ग्राहकाने मासिक दोन हप्त्या मध्ये भरण्यास मुभा देण्यात येत आहे.

३) ग्राहक अर्जदारास मंचाचा निर्णय मान्य नसेल तर ग्राहक अर्जदार मंचाच्या निकालापासून ६० दिवसाच्या आत ब फॉर्म मध्ये आपले आवेदन खालील पत्त्यावर मा. विद्युत लोकपाल यांचे कडे सदर करू शकतात फॉर्म ब या कार्यालयात कार्यालयीन कार्यालयीन वेळेत विनामुल्य मिळेल. मा. विद्यूत लोकपाल यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.

विद्युत लोकपाल यांचा पत्ताः-
मा.विद्युत लोकपाल
महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग,
प्लॉट नं.१२ श्रीकष्ण विजय नगर छावणी,
नागपूर-४४००१३.
दुरध्वनी क्र.०७१२-२०२२१९८

ठिकाण : - लातूर
दिांक :- ०३.०६.२०१९

3.6.19 — अध्यक्ष, ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर

3-6-19 — सदस्य, ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर

कार्यकारी अभियंता/सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच लातूर